प्रसिद्धीसाठी

नोव्हेंबर १७, २००९

# अंथरुणाला खिळलेल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या बळीने डॉ. किरीट सोमय्यांच्या पुस्तकाचे विमोचन केले

सीएसटी येथे गंभीररित्या जखमी झालेला जगन बोकाडे, २६/११ पासून अंथरुणाला खिळलेला आहे. गेल्या महिन्यापर्यंत तो बॉम्बे हॉस्पिटलमध्ये होता-काही आठवड्यातच केल्या जाणाऱ्या आणखी काही शस्त्रक्रियांसाठी त्याला पुन्हा भरती केले होते. जगन बोकाडेने आज माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या, यांच्या ''**२६/११ - व्हीक्टीम्स ऑफ टेररिझम (२६/११ च्या दहशतवादाचे बळी)**''.या पुस्तिकेचे त्याच्या राहत्या घरी अंथरुणावर पडूनच विमोचन केले. सदर पुस्तिकेत ''एक वर्षानंतरही उपचार, भरपाई, मदत आणि पुनर्वसन यासाठी झगडत असलेल्या बळींची'' अनेक उदाहरणे दिली आहेत.

२६/११ आणि ७/११ च्या दहशतवादी हल्ल्यांना बळी पडलेल्या व्यक्ती धर्मांध दहशतवादी आणि यंत्रणेचा दहशतवाद म्हणजेच लाल फितीचा कारभार, अशा दोन्ही आघाड्यांचा वर्षभर सामना करीत आहेत आणि तरीही भरपाई, वैद्यकीय शस्त्रक्रिया, आणि आश्वसन दिलेल्या नोकऱ्यांपासून अजूनही वंचित आहेत. भाजप नेता डॉ. किरीट सोमय्या यंनी या पुस्तिकेत जगन बोकाडेसारखी अनेक उदाहरणे दिली आहेत. पंतप्रधान, भारत सरकारचे गृह मंत्रालय, रेल्वे क्लेम्स ट्रीब्यूनल यानी आश्वासन दिलेला निधी/भरपाई एक वर्ष होत आले तरीही मिळालेली नाही.

बळी पडलेल्या व्यक्तींवर पाठोपाठ कराव्या लागलेल्या शस्त्रक्रिया आणि महागडे वैद्यकीय उपचार यासाठी त्यांना मदत करण्याचे किंवा सहकार्य करण्याचे अधिकाऱ्यांनी नाकारले आहे. जगनवर आणखी शस्त्रक्रिया कराव्या लागणार आहेत, ज्याचा खर्च रु. २.५ लाखापर्यंत जाऊ शकतो. डॉ. किरीट सोमय्या आणि युवक प्रतिष्ठान यांनी या शस्त्रक्रियांसाठी जगन बोकाडे याला रु. १ लाखाचा धनादेश दिला आणि संपूर्ण शस्त्रक्रियेच्या दरम्यान काळजी घेण्याचेही आश्वासन दिले. मीरा रोडचे महापौर, श्री. नरेंद्र मेहता, विधान परिषद सदस्य श्री. संजय केळकर, हे सुद्धा जगनच्या भायंदर येथील छोट्या घरात पुस्तिकेच्या विमोचनाच्या प्रसंगी उपस्थित होते.

**जगन बोकाडे:** पत्नी आणि सहा वर्षांचा मुलगा असलेला ३५ वर्षांचा तरुण. जगन २६/११ पासून अंथरुणाला खिळलेला आहे. शस्त्रक्रिया, भरपाई आणि उदरनिर्वाहाची चिंता करतो आहे.

**भरत नवादिया:** या तरुणाची पत्नी सीएसटी येथे २६/११ रोजी दहशतवाद्यांच्या गोळीला बळी पडली. भरतला उजव्या हाताला गोळी लागली, शस्त्रक्रिया करण्यात आली आणि पुढील उपचार/शस्त्रक्रियांच्या प्रतीक्षेत आहे. त्याच्यावर २ आणि ३ वर्षांच्या २ मुलांची जबाबदारी आहे.

**भूषण चंद्रकांत तांडेल:** याचे वडील २६/११ रोजी सीएसटी येथे दहशतवाद्यांच्या गोळीबाराची शिकार झाले.या ठिकाणी यंत्रणेचा दहशतवाद पहा. गेल्या आठ महिन्यातील आमच्या अथक परिश्रमानंतर धनादेश तर मिळाला, पण भारत सरकारच्या बँकरने तो परत पाठवला. अधिकाऱ्यांना परत भेटलो पण काही उपयोग नाही.
रेल्वेने आश्वासन दिलेल्या नोकरीच्या बाबतीत भूषणची परिस्थिती ''**ॲप्लाय ॲप्लाय नो रिप्लाय**'' अशी आहे.

**लालजी पांडे:** या ५४ वर्षीय व्यक्तीचा उजवा हात गोळी लागून निकामी झाला. एकापाठोपाठ एक शस्त्रक्रिया कराव्या लागल्या पण सरकारकडून मदत मिळाली फक्त रु. ५०,०००/-. जाहीर केलेले मदत आणि पुनर्वसन पॅकज मिळविण्यासाठी दारोदार खेपा घालतो आहे.

**झीनाबी रहमतुल्ला:** यांचा पति २६/११ रोजी सीएसटी गोळीचा बळी ठरला. त्यांच्या नातवाला सुद्धा दोन गोळ्या लागल्या. एक गोळी काढली, एक अजून शरीरातच आहे. पुढच्या शस्त्रक्रियेच्या प्रतीक्षेत आहे.

**अशोक सुन्नप:** २५ वर्षांच्या अशोकला २६/११ रोजी नरीमन हाउस येथे यकृतात गोळी लागली. यकृत कमकुवत झाले परिणामी कायस्वरुपी अशक्तपणा आला. नोकरी करू शकत नाही. कुटुंब आणि उदरनिर्वाहाच्या चिंतेत आहे.

***प्रसिद्धी सचिव***